नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
संपादक : कमलाकर सोनकांबळे
YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - २३१ Issue - 231 | वार शनिवार दि. १० जानेवारी २०२६ Blow- Saturday Date 10 January 2026 | ई-पेपर - https://epaper.yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@gmail.com

# हिमाचलमध्ये भीषण अपघात, १२ जणांचा मृत्यू

## ४५ प्रवाशांसह बस दरीत कोसळली; आकडा वाढण्याची भीती





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : हिमाचलच्या सिरमौर जिल्ह्यातील हरिपूरधार येथे एका खाजगी बसचा भीषण अपघात झाला. या अपघातात आतापर्यंत बारा जणांचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे. तर, अनेक जण जखमी झाले आहेत. जखमींना घटनास्थळावरून बाहेर काढण्यात येत आहे. सध्या बचावकार्य सुरू आहे.

ही बस कुपवीहून शिमलाच्या दिशेने जात होती. रस्त्यात हरिपूरधारजवळ ती ५० मीटर खोल दरीत कोसळली. मिळालेल्या माहितीनुसार, त्यावेळी बसमधून ४५ जण प्रवास करत होते.

अपघात झाल्याचं लक्षात येताच स्थानिकांनी तात्काळ धाव घेतली आणि जखमींना वर रस्त्यापर्यंत आणलं. अपघातानंतर घटनास्थळी एकच गोंधळ माजला, सगळीकडे किंचाळ्या ऐकू येत होत्या, जखमी लोक मदतीसाठी याचना करत होते.

हा अपघात इतका भीषण होता की यामध्ये बस पूर्णपणे उद्ध्वस्त झाली आहे. तर, आतापर्यंत १२ जणांना आपला जीव गमवावा लागल्याची माहिती आहे. तर, अनेक जण जखमी झाले आहेत.


शुक्रवारी दुपारच्या सुमारास हा अपघात झाला. बचावकार्य सुरू आहे. पाच गंभीर जखमी रुग्णांना उपचारासाठी हायर संग्राह, दादाहू आणि नाहान येथे पाठवण्यात आलं आहे. हा अपघात कशामुळे झाला याचं कारण अद्याप समजलेले नाही.

सिरमौरचे एसपी निश्चिंत सिंह नेगी यांनी सांगितले की, कुपवीहून शिमलाला जाणारी एक खाजगी बस सिरमौर जिल्ह्यातील हरिपूरधारजवळ रस्त्यावर कोसळल्याने अनेकांचा मृत्यू झाला आहे. मृतांचा आकडा वाढू शकतो. बसमध्ये ३०-३५ लोक होते. आम्ही सध्या अधिक माहितीची वाट पाहत आहोत. मी घटनास्थळी पोहोचत आहे. पोलिस आणि इतर बचाव पथके जखमींना वाचवण्यासाठी काम करत आहेत.

दरम्यान, उद्योग मंत्री हर्षवर्धन चौहान यांनी सरकारच्या वतीने शोक व्यक्त केला. त्यांनी नाहान येथील मेडिकल कॉलेजमध्ये आणल्या जाणाऱ्या गंभीर जखमी रुग्णांच्या उपचारांसाठी योग्य व्यवस्था करण्याचे निर्देश दिले. काहींना राजगड आणि दादाहू येथे रेफर करण्यात आले आहे. मेडिकल कॉलेजमध्ये उपचारांची तयारी पूर्ण झाली आहे. सिरमौर जिल्ह्यातील बस अपघातातील काही जखमींना राजगड आणि दादाहू येथे रेफर करण्यात आले आहे. मेडिकल कॉलेजमध्ये उपचारांची तयारी पूर्ण झाली आहे. उद्योग मंत्री स्वतः मेडिकल कॉलेजमध्ये उपस्थित आहेत. त्यांनी १२ जणांच्या मृत्यूची पुष्टी केली.

---

# पक्ष चालवायला भाजपला बरबटलेली माणसं चालतात



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नाशिक : भाजपचं हिंदुत्व हे खरं आहे की चुनावी आहे असं म्हणत उद्धव ठाकरे यांनी जोरदार टीका केली. राम मंदिर केलं म्हणून तुम्ही डंका पिटला आणि प्रभू रामचंद्र जिथं तपश्चेला बसले होते, तेथील सगळी झाडं जर कापली तर आम्ही काय सांगणार? असा

### नाशिकमधून उद्धव ठाकरेंचा हल्लाबोल, फडणवीसांवरही टीका

सवाल उद्धव ठाकरेंनी सरकारला केला. देवेंद्र फडणवीसांनी नाशिक शहर दत्तक घेतलं होतं. पण ज्यांना राजकारणात पोरं होत नाहीत ते आमची पोरं दत्तक घेतायेत ते काय शहरं दत्तक घेणार? असा टोला ठाकरेंनी फडणवीसांना लगावला. भाजप हा उपटसुंभांचा पक्ष झाला आहे. आमचं व्यासपीठ हाऊसफुल आहे. आमच्याकडे पोरांचा तोटा नाही. मोठे केलेले गेली असतील पण ज्यांनी मोठं केलं ती माणसं सोबत असल्याचे ठाकरे म्हणाले.

पक्ष चालवायला भाजपला बरबटलेली माणसं चालतात. त्यांना डोक्यावर नाचवताय असे ठाकरे म्हणाले. आम्ही एकत्र आल्यानंतर ज्यांनी फटाके फोडले दुसऱ्या दिवशी तेच तिकडे गेले. वाईट निष्ठावान कार्यकर्त्यांचे वाटत आहे. देवयानी ताई यांच्याबाबत मला आदर आहे. त्यांना रडू आलं. तुमची निष्ठा ज्या पक्षाशी आहे, तो पक्ष आज उपऱ्यांचा दलालांचा पक्ष झाला आहे. शनी शिंगणापूर आणि भाजपला दरवाडे नाहीत असे मुनगंटीवार म्हणाले. भाजपमध्ये चोर दरोडेखोर येतात. राणालासुद्धा भाजपमध्ये घेतील एवढे निर्लज्ज झालेत. भाजपने पाठीत वार केला म्हणून मी काँग्रेससोबत गेलो होते. भाजपने एमआयएमसोबत युती केली आहे, तेव्हा तुमचं हिंदुत्व कुठे गेलं? असा सवाल ठाकरेंनी केला. भाजपने त्यांच्या फडक्या वरील हिरवा रंग काढावा आणि नंतर आम्हाला हिंदुत्व विषयी बोलावं असे ठाकरे म्हणाले.

**ठाकरे जे बोलतात ते करतात**

ठाकरे बोलतात ते करतात. मशाल तुमच्या हृदयात पेटली पाहिजे. राहुल नार्वेकरविधानसभा अध्यक्ष आहे. तो निपक्षपातीपणे काम केलं पाहिजे. भाजप मात्र, त्यांच्याघरात तीन तीन उमेदवार देते. पण यांनी काहीही गकेलं तरी चालते. निवडणूक आयोग शेपूट घालून बसले आहे. आज आपण सावध झाला नाहीतर गुलामीत राहावं लागेल. आम्ही सत्तेसाठी एकत्र आलोत. तुमच्या विकासासाठी आण्हाला सत्ता पाहिजे असे ठाकरे म्हणाले.

**पराभव होऊनसुद्धा शिवसेना संपली नाही**

नाशिकमध्ये गेल्या दोन वर्षीतील ही चौथी सभा आहे. पण आजच्या सभेत माझ्यासोबत माझा भाऊ राज ठाकरे आहे असे उद्धव ठाकरे म्हणाले. भावी नगरसेवकांना सांगतो, ही जनता तुमच्याकडे आशेने पाहत असल्याचे ठाकरे म्हणाले. राजने नाशिकमध्ये केलेली कामे आणि मुंबईत शिवसेने मुंबईत केलेली कामे समोर आहेत. जेव्हा आम्ही एकत्र नव्हतो तेव्हा एकत्र का नाही असे विचारत होते. आता विचारतात का एकत्र आलो असे उद्धव ठाकरे म्हणाले. परभव होऊनसुद्धा शिवसेना संपलेली नाही.

---

# राज ठाकरे इतिहासातील सर्वात मोठ्या पराभवाचे धनी ठरतील; फडणवीसांनी मांडले पराभवाचे गणित



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : मनसे प्रमुख राज ठाकरे यांच्याबद्दल बोलताना मुख्यमंत्री फडणवीस यांनी चक्क त्यांच्या राजकीय भविष्याबद्दल भविष्यवाणी केली आहे. राज ठाकरे हे केवळ पराभूत होणार नाहीत, तर इतिहासात सर्वाधिक मोठ्या पराभवाचे धनी म्हणून त्यांची ओळख निर्माण होईल, अशा कडक शब्दांत फडणवीसांनी राज ठाकरेंना लक्ष्य केले आहे. या मुलाखतीदरम्यान फडणवीस यांनी शिवसेना (उबाठा) प्रमुख उद्धव ठाकरे यांच्यावरही जोरदार टीका केली. हिंदुत्वाचा आणि बाळासाहेबांच्या विचारांचा वारसा सांगणाऱ्या उद्धव ठाकरेंना प्रत्युत्तर देताना फडणवीस म्हणाले की, कोणालाही जन्मामुळे वडिलांची मालमत्ता मिळू शकते, पण विचारांचा वारसा मिळवण्यासाठी कर्तृत्व लागते. यांना विचारांचा वारसा मिळालेला नाही. या विधानातून त्यांनी उद्धव ठाकरेंचे नेतृत्व आणि विचारधारेवर थेट प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. निवडणुकीच्या निकालानंतर माझी ही भविष्यवाणी खरी ठरेल, असे आव्हानही फडणवीस यांनी दिले आहे. राज ठाकरे यांच्या 'किंगमेकर' होण्याच्या स्वप्नावर आणि उद्धव ठाकरेंच्या 'वारसा' सांगण्यावर फडणवीसांनी एकाच वेळी हल्ला चढवल्याने राजकीय वर्तुळात आता वादाला तोंड फुटले आहे.

राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांचे एकत्र येणे हा राजकीयदृष्ट्या निरर्थक प्रयत्न असल्याचे सांगत, फडणवीस यांनी राज ठाकरेंच्या भविष्यातील राजकीय स्थितीवर मोठी भविष्यवाणी केली आहे. या निवडणुकीत राज ठाकरे केवळ पराभूतच होणार नाहीत, तर इतिहासात सर्वात मोठ्या पराभवाचे धनी म्हणून त्यांची नोंद होईल, अशा शब्दांत त्यांनी आपला आत्मविश्वास व्यक्त केला. दिलेल्या विशेष मुलाखतीत मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, राज आणि उद्धव ठाकरे यांनी एकत्र येण्यासाठी खूप उशीर केला आहे. जर ही युती २००९ मध्ये झाली असती, तर त्यांना मतांचा मोठा फायदा झाला असता आणि राज्याची राजकीय परिस्थिती काही वेगळी असती. पण आज त्यांच्याकडे स्वतःची हक्काची मतं उरलेली नाहीत. त्यामुळे या युतीचा राज ठाकरेंना कोणताही राजकीय लाभ होणार नाही. या युतीवर भाष्य करताना फडणवीस यांनी एक गणित मांडले. त्यांच्या मते, राज ठाकरेंच्या युतीचा फायदा उद्धव ठाकरेंना नक्कीच होऊ शकतो, मात्र उद्धव ठाकरेंच्या पाठिंब्याचा राज ठाकरेंना कोणताही फायदा होणार नाही. याउलट, राज ठाकरे आणि मनसे या युतीतील 'बिगेस्ट लूजर' (सर्वात जास्त नुकसान सोसणारे) ठरतील. निवडणुकीच्या निकालानंतर माझी ही भविष्यवाणी तुम्ही पडताळून पाहा, असे खुले आव्हानच फडणवीस यांनी दिले आहे.

---

### राज ठाकरेंचा सीएम फडणवीसांवर थेट हल्ला

### भलीमोठी यादीच वाचली

# दत्तक घेणारा बाप फिरकलाच नाही!



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नाशिक: १९५२ मध्ये जन्माला आलेल्या पक्षाला आजही दुसऱ्याची पोरं मांडीवर घ्यावी लागतात, अशा शब्दांत मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी भाजपचा समाचार घेतला आहे. जनसंघातून भाजपचा जन्म झाला. १९५२ मध्ये जनसंघाची स्थापना झाली. पुढे भाजपची स्थापना झाली. पण आजही यांना दुसऱ्यांचीच पोरं लागतात, असा खोचक टोला राज ठाकरेंनी लगावला. नाशिकमधील सभेत ते बोलत होते. यावेळी त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना थेट लक्ष्य केलं.

२०१२ मध्ये नाशिक महापालिकेत भाजपची सत्ता आली. त्या कालावधीत झालेल्या कामांचा उल्लेख राज यांनी केला. 'पाच वर्षांमध्ये इतकी कामं करुनही जनतेनं पराभव केला. भाजपच्या भुलथापांना लोक बळी पडले, याचं वाईट वाटतं,' अशी खंत त्यांनी बोलून दाखवली. २०१७ मध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस नाशिकमध्ये प्रचाराला आले. नाशिकमध्ये सत्ता द्या. मी नाशिकला दत्तक घेतो म्हणाले. पुढे तो बाप नाशिककडे फिरकलाच नाही, अशा शब्दांत राज यांनी फडणवीस यांच्यावर टीका केली.

नाशिक दत्तक देण्याचं आवाहन करताना फडणवीस यांनी नाशिककरांना कोणकोणती आश्वासनं दिली होती, याची यादीच राज ठाकरेंनी वाचून दाखवली. मी प्रकल्पांची, योजनांची नावं वाचतो. तुम्हीच सांगा, यातली किती आश्वासनं पूर्ण झाली, असं राज ठाकरे गर्दीला उद्देशून म्हणाले. नाशिक न्यू मेट्रो प्रकल्प, नाशिक आयटी पार्क, नाशिक लॉजिस्टिक पार्क, द्वारका नाशिक उड्डाणपूल, नाशिक बाह्य रिंग रोड, नाशिक पुणे सेमी हाय स्पीड रेल्वे मार्ग, इगतपुरीला आदिवासी क्रीडा प्रबोधिनी, अशी फडणवीस यांनी दिलेल्या आश्वासनांची यादीच राज यांनी वाचून दाखवली. त्यावर समोरील गर्दीनं हे प्रकल्प पूर्णच झाले नसल्याचं सांगितलं.

नाशिकमध्ये मनसेची सत्ता असताना २०१२ मध्ये कुंभमेळा झाला होता. त्यावेही एकही झाड तोडलं गेलं नव्हतं, असं राज म्हणाले. त्यावेळी मनसेची सत्ता होती. उत्तम नियोजन झालं. साधू संतांनी समाधान व्यक्त केलं. सगळ्याच पक्षांनी सहकार्य केलं. तेव्हा एकही झाड न तोडता कुंभमेळा झाला. मग आता झाडं का तोडावी लागत आहेत, असा सवाल राज यांनी विचारला. उद्योगपतींसाठी जमिनी मोकळ्या करायच्या. आधी तिथे कुंभमेळा घ्यायचा आणि मग हव्या असलेल्या उद्योगपतीच्या घशात घालायचा, असा यांचा डाव आहे, असा गंभीर आरोप राज ठाकरेंनी केला.

---

# नागपूर, भंडाऱ्यात ईडीची छापेमारी; वाळू तस्करीचे संपूर्ण नेटवर्क उघडकीस येण्याची शक्यता

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नागपूर : : राज्यभरात महापालिका निवडणुकीची रणधुमाळी सुरू असतानाच अंमलबजावनी संचालनालय म्हणजेच ईडीने कोट्यवधींच्या अवैध वाळू उत्खनन घोटाळ्यासंदर्भात नागपूर आणि भंडाऱ्यात वाळू माफियांवर छापे घातलेत. भंडाऱ्यात दोन वाळू व्यावसायिकाच्या घरावर छापेमारीनंतर एऊ ने १२ तास चौकशी केलीय. यात महत्वाचे कागदपत्र, दोन मोबाईल, नोंदणी रजिस्टरसह ४.५० लाखांची रोकड सापडली असल्याची माहिती आहे. सोबतच दोन पोकलँड, दोन जेसीबी, फॉर्च्यूनरला देखील जप्त करत सील ठोकले आहे.

तर दुसरीकडे सकाळपासूनच नागपूरच्या सावनेरसह पाटणसावंगी आणि खापा येथे एकाचवेळी छापे टाकण्यात आले. वाळू तस्करी व बनावट रॉयल्टी प्रकरण संदर्भात हे छापे असल्याची माहिती आहे. २०२२ मध्ये नागपूरचे तत्कालीन पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी जिल्ह्यात अवैध वाळू उत्खननाविरोधात कठोर मोहीम हाती घेतली होती. तेव्हा काही प्रकरण नागपूर शहर पोलिसांनी वाळू माफिया विरोधात नोंदवले होते. त्याच प्रकरणाच्या तपासातून पुढे मनी लॉन्ड्रिंगचा संशय बळावल्याने पोलिसांनी ते प्रकरण ईडीकडे सोपवले होते.

दरम्यान, शुक्रवारी त्याच अनुषंगाने ईडीने नागपुरात वाळू माफिया आणि त्यांच्याशी संबंधित लोकांचे घर कार्यालय आणि इतर ठिकाणांवर छापे घातले. या छाप्यात ईडीच्या टीमने अवैध वाळू उत्खननाच्या आर्थिक व्यवहारांचे धागेदोरे तपासण्याच्या दृष्टीने काही दस्तऐवज, डिजिटल उपकरणे आणि अन्य महत्त्वाचे पुरावे ताब्यात घेतल्याची माहिती आहे. आता ईडीच्या या कारवाईमुळे नागपूर जिल्ह्यात वाळू तस्करीचे संपूर्ण नेटवर्क उघडकीस येण्याची शक्यता वर्तवली जात असून, पुढील दिवसांत आणखी धक्कादायक खुलासे होण्याची शक्यता नाकारता येत नाही. विशेष म्हणजे ईडीने केलेल्या कारवाई मधील बहुतांश जण राज्याच्या एका माजी मंत्री यांच्या संपर्कातील असल्याचे बोलले जात आहे. महाराष्ट्राच्या नद्यांमधून वाळूचे मोठ्या प्रमाणात अवैध उत्खनन करून ती वाळू मध्यप्रदेशातून आणल्याचे बनावट कागदपत्राच्या माध्यमातून त्याची नागपूरमध्ये विक्री करण्यात येत होती. यात महाराष्ट्र सरकारला कोट्यवधींचा चुना लावल्या जात असल्याचं प्रकरण समोर आल्यानंतर नागपूर पोलिसांनी या वाळू माफियांच्या टोळीचा पर्दाफास केला होता.

या कारवाईत मध्यप्रदेशच्या भोपाळमधून एकाला आणि अन्य पाच जणांना नागपुरातून अटक केली होती. या कारवाईनंतर १०० पेक्षा अधिक वाळू माफिया अंडरग्राउंड झाले होते. या प्रकरणाच्या संपूर्ण चौकशीसाठी आता हे प्रकरण ईडीकडे सोपविण्यात आलं आहे. ईडीनं पुन्हा एकदा वाळू व्यवसायाशी जुळलेल्या व्यक्तींच्या प्रतिष्ठान किंवा घरांवर छापेमारी केली आहे. अशातच, भंडाऱ्याच्या मध्यप्रदेशच्या सीमेवरील तुमसर तालुक्यातील डोंगरी बुद्रुक येथील रोहित मिरचूले आणि अजय गहाणे यांच्या दुकानावर आणि लोभी येथील त्यांच्या घरावर ईडी च्या अधिकाऱ्यांनी छापेमारी केली. सुमारे १२ तास ही चौकशी चालली. यात रोहित मिरचूले यांच्याकडे एऊ च्या अधिकाऱ्यांना फारसं काही सापडलं नाही. (पान २ वर...)

दैनिक
# यश सिद्धि न्यूज

शनिवार दि. १० जानेवारी २०२६ 

## संपादकीय....

### 'टॅरिफ'मुळे बाजार तळाला

भारतीय शेअर बाजारासाठी हा आठवडा निराशाजनक राहिला आहे. गेल्या पाच दिवसात सेन्सेक्स २२०० अंकांनी घसरला. आज सेन्सेक्स ६०४ अंकांनी घसरुन ८३५७६ अंकांवर आला तर निफ्टी १९३ अंकांनी घसरुन २५६८३ अंकांवर बंज झाला. निफ्टी बँकमध्ये ४३५ अंकांची घसरण झाली. बीएसई टॉप ३० कंपन्यांपैकी २१ कंपन्याचे शेअर घसरणीसह बंद झाले. तर, केवळ ९ शेअर तेजीसह बंद झाले. गेल्या पाच दिवसात सेन्सेक्स आणि निफ्टीत झालेल्या घसरणीमुळं गुंतवणूकदारांचं १३ लाख कोटींचं नुकसान झालं. भारतीय शेअर बाजारातील घसरणीचं प्रमुख कारण बीएसई मिडकॅप आणि बीएसई स्मॉल कॅप निर्देशांकात घसरण होणं आहे. रशियाकडून तेल खरेदी करणाऱ्या देशांवर अमेरिका ५०० टक्के टॅरिफ आकारणार आहे. त्यामुळं गुंतवणूकदारांमध्ये धास्तीचं वातावरण आहे. बीएसईचं बाजारमूल्य पाच दिवसात १३.३७ लाख कोटी रुपयांनी घसरलं आहे. काल बीएसईचं बाजारमूल्य ४७२.२५ लाख कोटी होतं, त्यात एका दिवसात ४.३८ लाख कोटी रुपयांनी घसरण झाली आहे. अमेरिकन सिनेटर लींडसे ग्रॅहम यांनी डोनाल्ड ट्रम्प यांनी रशियावरील निर्बंध लादणाऱ्या विधेयकाला मंजरी दिली आहे. त्यानंतर ते विधेयक अमेरिकन काँग्रेसमध्ये मांडलं जाईल. त्या विधेयकात रशियाकडून तेल खरेदी करणाऱ्या देशांवर ५०० टॅरिफ लादलं जाईल. विदेशी गुंतवणूकदारांनी सलग पाच दिवस भारतीय शेअर बाजारातील विक्रीचं सत्र सुरु ठेवलं आहे. विदेशी गुंतवणूकदारांनी ८ जानेवारीला ३३६७.१२ कोटी रुपये काढून घेतले. जागतिक बाजारातील कमजोरी, आशिया बाजारातील घसरण आणि प्रलंबित असलेला अमेरिका- भारत व्यापारी करार याचा परिणाम शेअर बाजारावर झाला.

## नागपूर, भंडाऱ्यात ईडीची छापेमारी; वाळू तस्करीचे संपूर्ण नेटवर्क उघडकीस येण्याची शक्यता

(पान १ वरून..) मात्र, अजय गहाणे यांच्याकडे काही महत्त्वाच्या नोंदी असलेले तीन रजिस्टर, दोन बँकांचे खाते पुस्तक, घर आणि शेती खरेदीचे कागदपत्र, आणि ४.५० लाखांची रोख रक्कम, दोन मोबाईल हे महत्वाचे पुरावे अधिकाऱ्यांनी ताब्यात घेत सोबत नेले. तर, दोन पोकलँड मशीन, दोन जेसीबी, एक फॉर्च्यूनर हे वाहन ताब्यात घेत त्यांना सील ठोकले. दोन वाहनांमधून आलेल्या या पथकात मुंबई एऊ कार्यालयाचे असिस्टंट डायरेक्टर अंकुर शर्मा यांच्यासह सीआरपीएफचे दोन शस्त्रधारी जवान आणि एऊ कार्यालयाचे सहा अधिकारी, कर्मचाऱ्यांचा या पथकात समावेश होता. भंडारा जिल्ह्यातील आजपर्यंतची एऊ ची ही पहिलीचं मोठी कारवाई असल्याचं बोललं जात आहे.

# धम्माच्या प्रकाशाकडे वळलेले धम्माचे वारसदार, माझी दोन फुले : कबीरा आणि शर्वरी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

माझ्या काळजाचे दोन तुकडे, १४ वर्षांची मुलगी शर्वरी लोबसान्ग देगी आणि ७ वर्षांचा मुलगा कबीरा तेन्झिन धर्मा , दोघांना नुकताच भेटून आलो,आणि त्यांच्याबद्दलच्या भावना कागदावर व्यक्त कराव्याश्या वाटल्या. माझी दोन्ही मुलं जेव्हा धम्म ाच्या मार्गावर चालण्यासाठी 'चीवर' परिधान केलेली पहिली, तेव्हा एका वडिलांच्या मनात येणारी भावना ही केवळ अभिमानाची नाही, तर ती एका आध्यात्मिक समाधानाची आहे. आज एक वडील म्हणून माझे मन भरून आले आहे. संसाराच्या ज्या व्यापात आपण अडकलेलो असतो, तिथे माझ्या दोन चिमुकल्यांनी संपूर्ण जगाला आपले कुटुंब मानावं याच भावनेतून आम्ही हा निर्णय घेतला .

७ वर्षांचा कबीरा आणि १३ वर्षांची शर्वरी - ही केवळ माझी मुले राहिलेली नाहीत, तर ते आता बुद्धाच्या करुणेचे आणि प्रज्ञेचे वाहक झाले आहेत. कबीरा केवळ ७ वर्षांचा आहे. ज्या वयात मुलं खेळण्यांसाठी हट्ट करतात, तिथे माझा कबीरा दुसऱ्याचं दुःख पाहून व्याकुळ होतो. रस्त्यावरच्या भिकाऱ्याला दान देताना तो स्वतःकडे काय उरेल, याचा कधीच विचार करत नाही. त्याच्या या निस्वार्थ वृत्तीत मला भविष्यातील एक महान 'करुणासागर' दिसतो. त्याच्या त्या चिमुकल्या हातांनी जेव्हा तो दान देतो, तेव्हा जणू काही तो जगाला हेच सांगतो की, देण्यामध्येच खरा आनंद आहे. जो आनंदाने दुसऱ्याला देण्यासाठी पुढे सरसावतो, त्यातच म ला उद्याचा 'भिक्खू' दिसतो. 'भिक्खू' होण्यासाठी लागणारा सर्वात मोठा गुण म्हणजे 'करुणा', आणि ती कबीरामध्ये उपजतच आहे. दुसऱ्याला देण्यामध्ये जो आनंद असतो, तो त्याला या चिमुकल्या वयातच गवसला आहे. तो जेव्हा विचार न करता दान देतो, तेव्हा तो हेच सिद्ध करतो की बुद्धत्व हे वयाने नाही, तर विचारांनी आणि संस्कारांनी येतं. त्याच्या या निर्मळ आणि दयाळू स्वभावामुळेच त्याने धम्माचा मार्ग निवडला असावा, असं आता मला प्रकर्षाने जाणवतंय.

माझ्या चिमुकल्या कबीराच्या हातांत,

आज जगाला देण्यासारखं बरंच काही आहे...

त्याचं हे निस्वार्थ दान, उद्याच्या शांतीची साक्ष आहे.

शर्वरी १३ वर्षांची आहे - वयाचा असा टप्पा जिथे अनेक गोष्टींचे आकर्षण आणि चंचलता असते. पण माझी शर्वरी आज अत्यंत शांत आणि संयमी बनली आहे. तिचे बोलणे, तिचे वागणे आणि तिची समज आज एखाद्या परिपक्व साधकासारखी वाटते. धम्माच्या मार्गाने तिला दिलेली ही शांतता तिच्या व्यक्तिमत्त्वाला एका वेगळ्याच उंचीवर घेऊन गेली आहे. तिची ही स्थिरता पाहून मला खात्री पटते की, ती आयुष्यातील कोणत्याही वादळाला धैर्याने सामोरी जाईल.


वय जरी कोवळे, तरी विचारांची उंची गाठली,

संयमाच्या पाऊलवाटेवर, तिला स्वतःची ओळख झाली.

कोणत्याही संकटावर, ती धैर्याने मात करेल,

शर्वरी आता शांतपणे, यशाचे शिखर सर करेल.

हा मार्ग संयम, ध्यान आणि करुणेचा आहे. कबीरा आणि शर्वरी दोघांनी इतक्या लहान वयात धम्म ाचा मार्ग स्वीकारला आहे, हे पाहून अनेकांना प्रश्न पडू शकतो की पुढे त्यांचे काय होईल ? पण एक वडील म्हणून आणि धम्माचा अभ्यासक म्हणून, त्यांच्या भविष्याबद्दलची ही मांडणी अत्यंत सकारात्मक आणि आशादायी आहे.भविष्यात ते समाजासाठी 'दीपस्तंभ' कसे ठरतील,यासाठी पोषक वातावरण निर्मिती हे माझे काम असेल.



जेव्हा एखादा जीव लहान वयातच भिक्खू संघाचा भाग बनतो, तेव्हा त्याचे भविष्य केवळ वैयक्तिक राहत नाही, तर ते सामाजिक परिवर्तनाचे माध्यम बनते. भिक्खू बनणे म्हणजे केवळ ध्यान करणे नव्हे. पुढे जाऊन कबीरा आणि शर्वरी हे दोघेही पाली, संस्कृत आणि आधुनिक भाषांचा सखोल अभ्यास करतील. ते केवळ धार्मिक विधी करणारे भिक्खू नसतील, तर ते विज्ञानाची जोड देऊन बुद्ध धम्म सांगणारे आधुनिक विचारवंत बनतील. शर्वरीचा संयम तिला एक उत्तम 'मानसशास्त्रज्ञ' किंवा 'सल्लागार' म्हणून घडवेल, तर कबीराची दयाळू वृत्ती त्याला तळागाळातील लोकांसाठी काम करण्याची प्रेरणा देईल. कबीराकडे जी उपजत वृत्ती आहे, विचार न करता दान देण्याची ती भविष्यात 'परोपकाराचे' मोठे रूप घेईल. तो अनाथालये, रुग्णालये किंवा गरजूंच्या शिक्षणासाठी स्वतःला वाहून घेईल. समाजातील गरीब आणि वंचितांसाठी तो एक आधारवड ठरेल. लोक त्यांच्याकडे केवळ धार्मिक गुरु म्हणून नाही, तर 'दुःखात धावून येणारा मित्र' म्हणून पाहतील. आजच्या धावपळीच्या आणि तणावाच्या युगात जगाला शांततेची गरज आहे. शर्वरीचा संयम आणि तिची शांत वृत्ती समाजातील विस्कळीत झालेल्या मनांना सावरण्याचे काम करेल. ती विपश्यना आणि ध्यानाच्या माध्यमातून तरुणांना व्यसनांपासून आणि नैराश्यापासून दूर नेण्याचे महान कार्य करेल. समाजात जेव्हा जेव्हा अन्याय किंवा विषमता येईल, तेव्हा कबीरा आणि शर्वरी हे बुद्धांच्या समतेचा आणि न्यायाचा आवाज बनतील. ते समाजाला जात, धर्म आणि भेदांच्या पलीकडे जाऊन 'माणूस' म्हणून जगायला शिकवतील. त्यांचे चारित्र्य इतके शुद्ध असेल की, समाज त्यांच्याकडे पाहून स्वतःचे वर्तन सुधारेल.

कबीरा आणि शर्वरी केवळ भारतापुरते मर्यादित न राहता, जागतिक स्तरावर (खपींशीपरींळेपरश्र श्रर्शींशश्र) बुद्धांचा शांततेचा संदेश पोहोचवतील. विविध देशांतील धम्म परिषदांमध्ये ते भारताचे प्रतिनिधित्व करतील आणि युद्धग्रस्त जगाला करुणेची भाषा शिकवतील. माझा कबीरा आणि माझी शर्वरी, उद्याच्या जगाला शहाणपण देणारी विद्यापीठे होतील. त्यांच्या शब्दांत बुद्धांची करुणा असेल आणि त्यांच्या कृतीत बाबासाहेबांचे प्रज्ञाचक्षु असतील. ज्या हातांनी आज दान दिले जात आहे, तेच हात उद्या कोसळणाऱ्या समाजाला सावरतील. माझ्या मुलांचे भविष्य अत्यंत सुरक्षित आणि अर्थपूर्ण आहे. ते भौतिक संपत्तीत लोळणारे नसतील, पण ते 'विचारांनी श्रीमंत' आणि 'मानाने सम्राट' असतील. समाजाला अशा निस्वार्थ नेतृत्वाची आज नितांत गरज आहे.

लोक म्हणतात की मुलांनी वडिलांचे नाव मोठे करावे. पण आज माझ्या मुलांनी मलाच एक नवी ओळख दिली आहे. माझ्या संस्कारांचे चीज झाले, असे मला वाटते. आपल्या काळजाच्या तुकड्यांना स्वतःपासून लांब, एका खडतर पण पवित्र मार्गावर पाठवणे सोपे नसते. पण जेव्हा मी त्यांच्या डोळ्यांतील तेज पाहतो, तेव्हा माझे सर्व दुःख मावळते. कबीरा आणि शर्वरीचे भविष्य आता केवळ त्यांच्यापुरते मर्यादित नाही. ते हजारो लोकांसाठी आशेचा किरण बनणार आहेत. कबीराची 'दया' आणि शर्वरीचा 'संयम' एकत्र येऊन धम्माचा मोठा प्रचार आणि प्रसार करतील. ते दोघेही उत्तम शिक्षण घेतील, धम्माचा सखोल अभ्यास करतील आणि एक दिवस या समाजाला दुःखमुक्त करण्यासाठी आपले आयुष्य समर्पित करतील, याची मला खात्री आहे. कबीरा, तुझे दातृत्व जगाला श्रीमंत करो आणि शर्वरी, तुझी शांतता जगाला स्थिरता देवो. तुम्ही दोघेही बुद्धांच्या विचारांचे खंबीर स्तंभ बना. तुमचा हा मार्ग संघर्षाचा असला तरी तो अंतिम सुखाचा आहे. तुमचे भविष्य धम्माच्या प्रकाशाने नेहमी उजळलेले राहो !

**तुमचा अभिमान,**
**एक धन्य पिता.**

## 'इंडिया इंटरनॅशनल कॉन्फरन्स ऑन डेमोक्रसी अँड इलेक्शन मॅनेजमेंट २०२६' परिषदचे नवी दिल्ली येथे आयोजन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : भारत निवडणूक आयोगाच्यावतीने २१ ते २३ जानेवारी २०२६ या कालावधीत 'इंडिया इंटरनॅशनल कॉन्फरन्स ऑन डेमोक्रसी अँड इलेक्शन मॅनेजमेंट (आयआयसीडीईएम) २०२६' या पहिल्या आंतरराष्ट्रीय परिषदचे आयोजन नवी दिल्लीतील भारत मंडपम, येथे करण्यात येणार आहे.

ही तीन दिवसीय परिषद भारतीय आंतरराष्ट्रीय लोकशाही व निवडणूक व्यवस्थापन संस्था (आयआयआयडीईएम) मार्फत, निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शनाखाली आयोजित केली जाणार आहे. भारतामध्ये निवडणूक व्यवस्थापन आणि लोकशाही विषयावरील ही आतापर्यंतची सर्वात मोठी आंतरराष्ट्रीय परिषद ठरणार असून, जगभरातील विविध देशांच्या निवडणूक व्यवस्थापन संस्थांचे सुमारे १०० आंतरराष्ट्रीय प्रतिनिधी, आंतरराष्ट्रीय संघटनांचे प्रतिनिधी, भारतातील परराष्ट्र मिशनचे अधिकारी तसेच निवडणूक क्षेत्रातील तज्ज्ञ व अभ्यासक या परिषदेत सहभागी होणार आहेत.

भारताने २०२६ या वर्षासाठी 'इंटरनॅशनल आयडीईए' या संस्थेच्या सदस्य राष्ट्रांच्या परिषदेचे अध्यक्षपद स्वीकारल्यानंतर मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी मांडलेल्या दृष्टिकोनानुसार ही परिषद आयोजित होत असून, समावेशक, शांततापूर्ण, सक्षम आणि शाश्वत जगासाठी लोकशाही ही या परिषदेची मुख्य संकल्पना आहे. आयआयआयडीईएम चे महासंचालक राकेश वर्मा यांनी या परिषदेसंदर्भातील रूपरेषा मांडताना सांगितले की, ही परिषद निवडणूक व्यवस्थापन संस्थांमधील आंतरराष्ट्रीय सहकार्याचे व्यासपीठ ठरेल. निवडणूक प्रक्रियेत येणाऱ्या समकालीन आव्हानांवर सामूहिक चर्चा, सर्वोत्तम पद्धती व नावीन्यपूर्ण उपक्रमांची देवाणघेवाण आणि संयुक्त उपाययोजनांची निर्मिती या परिषदेत होणार आहे.

यावेळी आयआयसीडीईएम २०२६ च्या अधिकृत लोगोचे अनावरणही करण्यात आले. या परिषदेत सहभागी प्रतिनिधींना भारताची निवडणूक व्यवस्था, प्रक्रिया तसेच तंत्रज्ञानाधारित नवकल्पना यांची माहिती देण्यात येणार असून, भारतीय निवडणुका जगातील लोकशाही व्यवस्थांसाठी आदर्श ठरत असल्याचे अधोरेखित केले जाणार आहे. परिषदेच्या कार्यक्रमात उद्घाटन सत्र, निवडणूक व्यवस्थापन संस्थांच्या प्रमुखांची विशेष बैठक, कार्यगट बैठका, ईसीआयनेट चे उद्घाटन तसेच जागतिक निवडणूक विषयांवरील आणि आंतरराष्ट्रीय मानकांवरील विविध विषयक सत्रांचा समावेश आहे.

तीन दिवसांच्या या परिषदेदरम्यान मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार, निवडणूक आयुक्त डॉ. सुखबीर सिंग संधू आणि डॉ. विवेक जोशी यांच्या नेतृत्वाखाली ४० हून अधिक द्विपक्षीय बैठका विविध देशांच्या निवडणूक संस्थांच्या प्रमुखांसोबत पार पडणार आहेत. या परिषदेत चार आयआयटी, सहा आयआयएम, १२ राष्ट्रीय विधी विद्यापीठे (एनएलयू) आणि आयआयएमसी यांसह नामांकित शैक्षणिक संस्थांचा सहभाग राहणार असून, राज्ये व केंद्रशासित प्रदेशांचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय तज्ज्ञांच्या नेतृत्वाखाली ३६ विषयक गट चर्चेत सहभागी होणार आहेत, असे भारत निवडणूक आयोगाने प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळविले आहे.

## पत्रकार, समाजसेवक महेश तारमळे यांना मानद डॉक्टरेट पदवी बहाल

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे/प्रतिनिधी : पत्रकारिता आणि समाजसेवेच्या क्षेत्रात सातत्यपूर्ण, निर्भीड व लोकहितकारी कार्य करणारे दैनिक दे धडक बे धडक चे पत्रकार तथा समाजसेवक महेश अनंत तारमळे यांना मानद डॉक्टरेट पदवी बहाल करण्यात आली. ही पदवी त्यांच्या सामाजिक योगदानाची, निर्भीड पत्रकारितेची आणि सामान्य जनतेच्या प्रश्नांसाठी केलेल्या संघर्षाची दखल म्हणून देण्यात आली आहे. महेश तारमळे यांनी पत्रकारितेला केवळ व्यवसाय न मानता ती समाजपरिवर्तनाचे प्रभावी माध्यम मानले.ग्रामीण भागातील प्रश्न, शेतकरी, कामगार, गरीब व वंचित घटकांचे प्रश्न, प्रशासनातील त्रुटी, भ्रष्टाचार, अन्याय आणि गैरप्रकार यावर त्यांनी सातत्याने आवाज उठवला. सत्य, निर्भीडपणा आणि स्पष्ट मांडणी ही त्यांच्या पत्रकारितेची ओळख बनली आहे.दबावाला न झुकता, कोणाचीही भीडभाड न ठेवता त्यांनी अनेक गंभीर विषय समाजासमोर आणले.समाजसेवक म्हणूनही महेश तारमळे यांचे कार्य उल्लेखनीय आहे. गरजू नागरिकांना न्याय मिळवून देण्यासाठी मार्गदर्शन, प्रशासनाशी पाठपुरावा,विविध सामाजिक प्रश्नांवर जनजागृती, तसेच संकटात सापडलेल्या कुटुंबांना मदतीचा हात देण्याचे कार्य त्यांनी केले आहे.समाजातील दुर्लक्षित घटकांसाठी उभे राहणे,त्यांच्या वेदना समजून घेणे आणि त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणे, हेच त्यांच्या कार्याचे केंद्रबिंदू राहिले आहेत. मानद डॉक्टरेट पदवी हा सन्मान केवळ एका व्यक्तीचा नसून, निर्भीड पत्रकारिता आणि प्रामाणिक समाजसेवेचा सन्मान आहे, असे मत अनेक मान्यवरांनी व्यक्त केले. या सन्मानामुळे समाजासाठी काम करणाऱ्या तरुण पत्रकारांना आणि कार्यकर्त्यांना प्रेरणा मिळेल, असा विश्वासही व्यक्त करण्यात आला. या सन्मानानंतर प्रतिक्रिया देताना महेश अनंत तारमळे यांनी सांगितले की,ही पदवी माझ्यासाठी वैयक्तिक सन्मान नसून समाजासाठी, सत्यासाठी आणि न्यायासाठी काम करणाऱ्या प्रत्येक पत्रकार व कार्यकर्त्याचा सन्मान आहे. भविष्यातही मी अधिक जबाबदारीने, निर्भीडपणे आणि प्रामाणिकपणे समाजाच्या प्रश्नांसाठी लढत राहीन. मानद डॉक्टरेट पदवी मिळाल्याबद्दल महेश तारमळे यांचे सर्व स्तरातून



अभिनंदन होत असून, त्यांच्या पुढील कार्यासाठी शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.त्यांच्या कार्यातून समाजात सकारात्मक बदल घडावा आणि निर्भीड पत्रकारितेचा आवाज अधिक बुलंद व्हावा, हीच अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## 'मॉडेल महिला-स्नेही ग्रामपंचायतींच्या सर्वोत्तम पद्धती' राष्ट्रीय कार्यशाळेचा यशदा येथे शुभारंभ



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे (जिमाका वृत्तसेवा) : पंचायत राज मंत्रालय, भारत सरकार आणि ग्रामीण विकास व पंचायत राज विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने यशदा,पुणे येथे 'मॉडेल महिला-स्नेही ग्रामपंचायत - सर्वोत्तम पद्धती' या विषयावर दोन दिवसीय राष्ट्रीय कार्यशाळेचा गुरुवारी शुभारंभ झाला.

या कार्यशाळेचे उद्घाटन पंचायत राज मंत्रालयाचे अतिरिक्त सचिव सुशीलकुमार लोहाणी यांच्या हस्ते झाले. यावेळी ग्रामीण विकास व पंचायत राज विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, यशदाचे महासंचालक डॉ. निरंजन कुमार सुधांशू, संचालक विपुल उज्ज्वल, णछऋझ इंडियाच्या प्रमुख कार्यक्रम व तांत्रिक सहाय्य डॉ. दीपा प्रसाद तसेच उपमहासंचालक व संचालक, राज्य ग्रामीण विकास संस्था, यशदा पुणे डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी आदी मान्यवर उपस्थित होते.

लिंगसमतेला चालना देणे, ग्रामपंचायतींची संस्थात्मक क्षमता वाढवणे आणि ग्रामपातळीवर महिलांना निर्णयप्रक्रियेत सक्षम करणे हा या कार्यशाळेचा प्रमुख उद्देश आहे. देशातील सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्या मॉडेल महिला-स्नेही ग्रामपंचायतींनी राबविलेल्या नाविन्यपूर्ण उपक्रमांचे अनुभव परस्परांशी शेअर करण्यासाठी ही कार्यशाळा प्रभावी व्यासपीठ ठरत आहे. या कार्यशाळेत १३ राज्ये व केंद्रशासित प्रदेशांमधील सुमारे २०० हून अधिक प्रतिनिधी, निवडून आलेले लोकप्रतिनिधी, गटविकास अधिकारी तसेच राज्य डखठऊचे नोडल अधिकारी सहभागी झाले आहेत. प्रमुख भाषणात सुशीलकुमार लोहाणी यांनी थीम ९ - महिला-स्नेही ग्रामपंचायत आणि स्थानिकीकरण केलेल्या शाश्वत विकास उद्दिष्टांमधील सांगड अधोरेखित केली. ग्रामपंचायतींनी महिलांच्या दैनंदिन ग्रामपंचायत कारभारातील प्रत्यक्ष सहभागासाठी सहयोगी, सुरक्षित आणि सन्मानजनक वातावरण निर्माण करावे, असे आवाहन त्यांनी केले. महिलांचे जीवन अधिक आरोग्यदायी, सुरक्षित व आत्मनिर्भर होण्यासाठी ग्रामपातळीवर नियोजनबद्ध प्रयत्न आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी त्यांनी 'सरपंच पती'सारख्या प्रॉक्सी नेतृत्वाच्या निर्मूलनावर विशेष भर देत महिला लोकप्रतिनिधींना स्वतंत्र निर्णय घेण्याची संधी आणि सामाजिक पाठबळ मिळणे अत्यंत आवश्यक असल्याचे नमूद केले. विविध राज्यांतील उत्कृष्ट अनुभव आत्मसात करून ते आपल्या गावांमध्ये प्रभावीपणे राबवावेत, असे आवाहनही त्यांनी केले. महिला-स्नेही ग्रामपंचायत घडविण्यासाठी आर्थिक संसाधनांइतकेच सामाजिक प्रबोधन आणि मानसिक परिवर्तन महत्त्वाचे असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. महिलांसाठी सुरक्षित शौचालये, घरपोच नळजोडणीद्वारे पाणीपुरवठा, सार्वजनिक ठिकाणी सुरक्षितता व देखरेख व्यवस्था, आत्मविश्वास वृद्धीचे उपक्रम तसेच महिला विकासासाठी आर्थिक सहाय्य या बाबींना ग्रामपंचायतींनी प्राधान्य द्यावे, असे लोहाणी यांनी सांगितले. महिला व मुलींना कोणताही भेदभाव न करता गुणवत्तापूर्ण व प्रभावी सेवा मिळाल्या पाहिजेत, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. महिलांचे शिक्षण, कौशल्यविकास, बँकिंग साक्षरता, उद्योजकता, रोजगार संधी तसेच शासन व्यवस्थेतील सक्रिय सहभाग वाढविण्याची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले.

संचालक विपुल उज्ज्वल यांनी चथत्रञ्ञझ डॅशबोर्डद्वारे महिला-स्नेही ग्रामपंचायत उपक्रमाची संकल्पना व प्रमुख क्षेत्रांचा आढावा सादर केला. शासन सहभाग, आरोग्य व पोषण, शिक्षण व कौशल्यविकास, आर्थिक संधींमध्ये प्रवेश, सुरक्षितता व संरक्षण या उपविषयांवर आधारित ३५ सूचकांकांचा विशेष डॅशबोर्ड विकसित करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. या डॅशबोर्डद्वारे तिमाही आढावा व राज्यस्तरीय क्रमवारी निश्चित करता येणार असून डेटा वैधतेला विशेष महत्त्व देण्याचे आवाहन त्यांनी केले. ग्रामीण विकास व पंचायत राज विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले यांनी लिंग भेदविरहित संवेदनशील नियोजनाची गरज अधोरेखित करत स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांना दिलेले ५० टक्के आरक्षण प्रत्यक्ष सशक्तीकरणात परिवर्तित होणे आवश्यक असल्याचे सांगितले. मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानांतर्गत महिला-स्नेही ग्रामपंचायत या संकल्पनेला शासनाकडून ठोस पाठबळ दिले जात असल्याचाही त्यांनी उल्लेख केला.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

दैनिक
यश सिद्धि न्यूज



# मराठी संस्कृतीची मेजवानी मनाला सुखद धक्का देणारी : अभिनेते भरत जाधव

## महाराष्ट्र सदनात मकर संक्रांती महोत्सव, हुरडा पार्टीचे उद्घाटन; या उपक्रमामुळे दिल्लीतही महाराष्ट्राचा सुगंध दरवळतो आहे.





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : एक कलाकार म्हणून कला आणि आपल्या संस्कृतीविषयी बोलताना मिळणारा आनंद हा शब्दांत व्यक्त न करण्याजोगा असतो. महाराष्ट्र सदनात पहिल्यांदाच असा अनुभव घेताना मला मनापासून समाधान वाटत आहे. दिल्लीसारख्या महानगरात, जिथे विविध प्रांतांचे लोक येतात, तिथे आपल्या महाराष्ट्राची संस्कृती आणि खाद्यसंस्कृतीची चव पोहोचवणे हे अभिमानास्पद कार्य आहे, अशा शब्दांत लोकप्रिय अभिनेते भरत जाधव यांनी दिल्लीतील मराठी संस्कृती संवर्धनाच्या उपक्रमाचे कौतुक केले. महाराष्ट्र सदनामध्ये आयोजित 'मकर संक्रांती महोत्सव' व 'हुरडा पार्टी'चे उद्घाटन जाधव यांच्या हस्ते झाले, त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी मंचावर निवासी आयुक्त तथा सचिव आर. विमला, निवासी आयुक्त (गुंतवणूक) सुशील गायकवाड, माहिती संचालक हेमराज बागुल, सहायक निवासी आयुक्त नितीन शेंडे, स्मिता शेलार, जनसंपर्क अधिकारी मनीषा पिंगळे उपस्थित होते.

यावेळी जाधव म्हणाले, महाराष्ट्रात हुरडा पार्टीचा आनंद सर्वजण घेतोच, पण परराज्यात आपल्या माणसांसाठी अशी मेजवानी मिळणे, ही मोठी पर्वणी आहे. या उपक्रमामुळे दिल्लीतही महाराष्ट्राचा सुगंध दरवळतो आहे. सर्व दिल्लीकरांनी या गावरान मेजवानीचा आस्वाद घेण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले.

**महाराष्ट्राची समृद्ध परंपरा सर्वदूर पोहोचवणे हेच आमचे ध्येय - निवासी आयुक्त आर. विमला**

निवासी आयुक्त तथा सचिव आर. विमला यांनी या महोत्सवाच्या सांस्कृतिक महत्त्वावर प्रकाश टाकला. त्या म्हणाल्या की, छत्रपती शिवाजी महाराजांनी ज्याप्रमाणे अटकेपार झेंडा फडकवून महाराष्ट्राची प्रचिती दिली, तोच सांस्कृतिक वारसा आज दिल्ली दरबारात आणि संपूर्ण देशात पोहोचवणे ही आपली जबाबदारी आहे. मकर संक्रांत हा सण देशाच्या विविध भागात वेगवेगळ्या नावाने साजरा केला जातो, या विविधतेतील एकता जपत महाराष्ट्राची विशेष खाद्य संस्कृती, विशेषतः 'हुरडा' आणि मराठमोळ्या परंपरा राष्ट्रीय स्तरावर पोहोचवण्याचा आमचा मानस आहे. ज्येष्ठ अभिनेते भरत जाधव यांच्या उपस्थितीमुळे महाराष्ट्राच्या भावना आणि संस्कृती अधिक प्रभावीपणे मांडली जात असून, यातून महाराष्ट्राची एक वेगळी ओळख दिल्लीत निर्माण होईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

**खाद्योत्सव आणि रानमेव्याच्या माध्यमातून बचत गटांना हक्काची बाजारपेठ - निवासी आयुक्त सुशील गायकवाड**

या उपक्रमाच्या माध्यमातून ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळ देण्याचे काम केले जात असल्याचे निवासी आयुक्त (गुंतवणूक) सुशील गायकवाड यांनी नमूद केले. ते म्हणाले की, महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील महिला बचत गटांना हक्काची बाजारपेठ मिळवून देणे हा या आयोजनाचा मुख्य उद्देश आहे. या उत्सवांच्या निमित्ताने अस्सल 'रानमेवा' आणि विविध स्थानिक उत्पादनांची विक्री दिल्लीत होत असून, यामुळे बचत गटांच्या आर्थिक सक्षमीकरणाला मोठी मदत होत आहे. दिल्लीकरांना महाराष्ट्राच्या चवींची ओळख करून देण्यासोबतच, मराठी माणसाला एकत्र जोडणारी ही कार्यक्रमांची मालिका भविष्यातही सातत्याने सुरू ठेवली जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

या महोत्सवात सोलापूर, ठाणे, पुणे, जळगाव, रायगड, परभणी, अहिल्यानगर, जालना आणि नाशिक अशा विविध जिल्ह्यांतील महिला बचत गटांनी सहभाग घेतला असून एकूण १६ स्टॉल्स उभारण्यात आले आहेत. यामध्ये 'उमेद'चे (राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान) १० आणि कृषी विभागाचे ६ स्टॉल आहेत. महोत्सवात ज्वारीच्या कोवळ्या हुरड्यासोबत खमंग लसूण चटणी, शेंगदाणा कूट, गूळ, साजूक तूप आणि ताक यांची रेलचेल आहे. तसेच चुलीवरचे वाफाळलेले पिठलं-भाकरी, भरीत-भाकरी, बटाटेवडे, भजी, ऊस, बोरं आणि ओला हरभरा अशा अस्सल गावरान पदार्थांचा आस्वाद खाद्यप्रेमी घेत आहेत. खाद्यपदार्थांव्यतिरिक्त कॉपर मेटलचे दागिने आणि हस्तकला वस्तू हे देखील आकर्षणाचे केंद्र ठरत आहेत.

महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागामार्फत राज्यातील शेतकऱ्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांचे सादरीकरणही येथे करण्यात आले आहे. यामध्ये महाडीबीटी पोर्टल, कृषी सल्ल्यासाठी 'महाविस्तार प' आणि राज्यामध्ये एकूण ३८ पिकांना मिळालेले जीआय (त्रख) मानांकन याविषयीची माहिती प्रदर्शित करण्यात आली आहे. तसेच संक्रांत सणानिमित्त वापरण्यात येणारे बोर, ऊस, हरभरा आणि लहान मुलांच्या 'बोरनहान'साठी लागणाऱ्या वस्तूंचे प्रदर्शन रांगोळीच्या माध्यमातून आकर्षकरीत्या मांडले आहे.

व्यवस्थापक प्रमोद कोलपते यांनी सूत्रसंचालन केले. महाराष्ट्र परिचय केंद्राचे माहिती संचालक हेमराज बागुल यांनी आभार मानले.

११ जानेवारीपर्यंत चालणाऱ्या या महोत्सवात सहभागी होऊन महाराष्ट्राचे आदरातिथ्य आणि संस्कृतीचा आनंद घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# आरोग्य कर्मचाऱ्यांसाठी सर्वसमावेशक प्रशिक्षणाचे नियोजन प्राधान्याने करा : मंत्री प्रकाश आबिटकर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : सार्वजनिक आरोग्य यंत्रणेच्या बळकटीकरणासाठी कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्याबाबतचा सर्वसमावेशक आराखडा तयार करुन त्याची प्रभावी अंमलबजावणी करावी, असे निर्देश सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिले.



आरोग्यमंत्री आबिटकर यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयातील समिती सभागृहात बैठक झाली. या बैठकीला आरोग्य विभागाचे प्रधान सचिव डॉ. निपुण विनायक, सचिव ई. रवींद्रन, आरोग्यसेवा आयुक्त डॉ. कादंबरी बलकवडे, आरोग्य सेवा संचालक डॉ. नितीन अंबाडेकर, सहसंचालक डॉ. सुनिता गोल्हाईत व डॉ. सरिता हजारे उपस्थित होते. तसेच विभागातील वरिष्ठ अधिकारी दूरदृश्य प्रणालीद्वारे बैठकीत सहभागी झाले होते.

सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत नियुक्त सल्लागार डॉ. सुभाष साळुंखे, (से.नि. महासंचालक, आरोग्य सेवा) आणि डॉ. मोहन जाधव, (से.नि. संचालक आरोग्य सेवा) यांनी यावेळी आरोग्य कर्मचाऱ्यांच्या प्रशिक्षणाचा मुद्दा अधोरेखित केला. आरोग्य मंत्री आबिटकर म्हणाले की, राज्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रे, उपजिल्हा रुग्णालये आणि जिल्हा स्तरावरील आरोग्य संस्थांमधील कर्मचाऱ्यांनी प्रभावी काम करावे, यासाठी त्यांनी आवश्यक प्रशिक्षण पूर्ण करावे. आपले प्रशिक्षण व प्रशिक्षण संस्था इतक्या प्रभावी सर्वसमावेशक असाव्यात की परराज्यांतील कर्मचाऱ्यांनीही या ठिकाणी प्रशिक्षण घेण्याची इच्छा व्यक्त करावी.

तालुका आरोग्य अधिकारीपदास प्राधान्याने बळकटी देण्यावर भर देण्यात येत असून तालुका आरोग्य अधिकारी हा राज्याच्या सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेत महत्वाचा असुन, प्रशिक्षण कार्यक्रमात तालुका आरोग्य अधिकारी (टीएचओ) आणि समुदाय आरोग्य अधिकारी (सीएचओ) यांचा आवर्जून समावेश करावा. पद संवर्गनिहाय प्रशिक्षणाचा सविस्तर आराखडा तयार करुन एक महिन्याच्या आत मान्यतेसाठी सादर करण्याचे निर्देशही त्यांनी यावेळी दिले.

# खामगाव ग्रामीण पत्रकार संघाच्या वतीने प्राध्यापक रविंद्र गुलाबराव चाटे यांचा सत्कार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

राहुल साबळे / बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी : लाखनवाडा येथे खामगाव तालुका ग्रामीण पत्रकार संघाच्या वतीने कार्यक्रम आयोजित केला होता, पत्रकार दिनाचे औचित साधून आयोजित केलेल्या कार्यक्रमांमध्ये विविध क्षेत्रांमध्ये काम करणाऱ्या व्यक्तींचा सत्कार पत्रकार संघाच्या वतीने करण्यात आला. यामध्ये लाखनवाडा येथे गेल्या दहा वर्षापासून महात्मा ज्योतिबा फुले कनिष्ठ महाविद्यालय लाखनवाडा येथे प्राचार्य पदावर काम करणारे प्राध्यापक रविंद्र गुलाबराव चाटे, यांचे परिसरामध्ये शिक्षण क्षेत्रात भरपूर असे योगदान आहे, विद्यार्थ्यांप्रती असलेली त्यांची आपुलकी जिव्हाळा , यास त्यांच्या स्वभावामुळे ते परिसरामध्ये प्रचलित आहे, प्रत्येक सामाजिक कार्यामध्ये त्यांचा सहभाग असतो , विद्यार्थ्यांना वेळोवेळी मार्गदर्शन करणे, तसेच महाराष्ट्रभर व्याख्यान करणे लेख लिहिणे, यास मुळे त्यांना ३० डिसेंबरला राज्यस्तरीय साहित्यरत्न पुरस्कार मिळाला , या अगोदर राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार सुद्धा त्यांना मिळाला होता , म्हणूनच खामगाव तालुका पत्रकार संघाच्या वतीने लाखनवाडा येथे आयोजित केलेल्या कार्यक्रमांमध्ये त्यांचा सन्मान करण्यात आला..



**मान्यवरांकडून पत्रकार परिषदेत आवाहन**

**नांदेड येथे २४ व २५ जानेवारी २०२६ रोजी भव्य कार्यक्रमाचे आयोजन**

# नांदेड येथील 'हिंद-दी-चादर' कार्यक्रम ऐतिहासिक करावा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नांदेड : 'हिंद-दी-चादर' श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांच्या ३५० शहीदी समागम वर्षानिमित्त नांदेड येथे २४ व २५ जानेवारी २०२६ रोजी भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमासाठी सर्व समाजातील नागरिकांनी उपस्थित राहून हा कार्यक्रम ऐतिहासिक करावा, असे आवाहन पत्रकार परिषदेत मान्यवरांनी केले.




सचखंड पब्लिक स्कूल येथील गुरु ग्रंथ साहिब भवन येथे आयोजित पत्रकार परिषदेस जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, तख्त सचखंड श्री हजूर साहिब गुरुद्वारा अबचलनगर नांदेडचे मुख्य जत्थेदार संत बाबा कुलवंत सिंगजी यांच्यासह भाई जोसिंदर सिंगजी, भाई राम सिंगजी, भाई कश्मीर सिंगजी, भाई गुरमीत सिंगजी, संत ज्ञानी हरनाम सिंग जी तसेच गुरुद्वारा लंगर साहिबचे संत बाबा बलविंदर सिंगजी, समिती अध्यक्ष डॉ. विजय सतबीर सिंग, सरजीत सिंग गिल, राज्यस्तरीय समितीचे समन्वयक रामेश्वर नाईक, महेंद्र रायचूरा (धर्म जागरण क्षेत्रीय प्रमुख पश्चिम क्षेत्र ) महंत सुनिल महाराज, महंत जितेंद्र महाराज, राष्ट्रीय बंजारा परिषदेचे संस्थापक किशनराव राठोड आदी उपस्थित होते.

राज्य शासनाचा अल्पसंख्याक विकास विभाग, राज्यस्तरीय समिती, शीख, सिकलीकर, बंजारा, लबाना, सिंधी, मोहयाल, वाल्मीकी, उदासीन व भगत नामदेव (वारकरी संप्रदाय) व इतर सर्व समाज यांच्या संयुक्त विद्यमाने 'हिंद-दी-चादर' कार्यक्रमाचे आयोजन नांदेड शहरातील मोदी मैदान येथे करण्यात आले आहे.

जथ्येदार साहेब भाई कुलवंत सिंग जी, संत ज्ञानी हरनाम सिंग जी यांनी 'हिंद-दी-चादर' या कार्यक्रमाचे महत्त्व विषद करून शीख व इतर समाजाचे कार्यक्रमाच्या अनुषंगाने असणाऱ्या योगदानाबद्दल माहिती दिली. या कार्यक्रमासाठी महाराष्ट्र शासन करत असलेल्या महत्त्वपूर्ण सहकार्याबद्दल त्यांनी आभार व्यक्त केले. भाविकांनी या कार्यक्रमासाठी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन त्यांनी केले

जिल्हाधिकारी राहुल कर्डिले म्हणाले की, महाराष्ट्र शासन व विविध समाज यांच्या संयुक्त विद्यमाने होणाऱ्या 'हिंद दी चादर' कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सध्या तयारी वेगाने सुरु आहे. भाविकांना कुठल्याही प्रकारची अडचण भासणार नाही याची पूर्णत: काळजी घेतली जाईल. कार्यक्रम व्यवस्थित पार पाडण्यासाठी विविध २५ समित्यांची स्थापना करण्यात आली असून समित्यांवर सोपविलेल्या कामाप्रमाणे नियुक्त अधिकारी व कर्मचारी दक्षतेने कामे करीत आहेत. भाविकांसाठी जिल्हानिहाय पार्किंगची ठिकाणे निश्चित करण्यात आली असून निवासासाठी शहरातील शाळा, महाविद्यालये व मोकळ्या जागा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. वाहतूक व्यवस्थेचे सुसूत्र नियोजन करण्यात आले असून आवश्यक वाहनांची व्यवस्था देखील करण्यात येत आहे. नांदेड हे रेल्वेमार्गावर असल्याने रेल्वे विभागाच्या सहकार्याने अधिकाधिक भाविकांना रेल्वे सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी नियोजन करण्यात येत आहे. लंगर, निवास, पाणी व वाहतूक व्यवस्थेचा दैनंदिन आढावा घेतला जात असून आरोग्य सेवांसाठी विविध रुग्णालयांमार्फत वैद्यकीय सुविधा पुरविण्यात येणार आहेत. कार्यक्रमस्थळी विविध आरोग्य स्टॉल उभारण्यात येणार आहेत. कार्यक्रमाच्या प्रचार-प्रसिद्धीसाठी विविध शाळांमध्ये स्पर्धांचे आयोजन करण्यात आले असून १५ जानेवारीपासून प्रभातफेऱ्या काढण्यात येणार आहेत.

राज्यस्तरीय समिती समन्वयक रामेश्वर नाईक म्हणाले की, शहिदी समागम केवळ धार्मिक कार्यक्रम नसून तो सर्वधर्म समभाव, मानवता, संविधानिक मूल्ये व सामाजिक ऐक्याचा संदेश देणारा ऐतिहासिक उपक्रम आहे. या शहिदी समागम उपक्रमांची सुरुवात नागपूर येथे यशस्वीरित्या पार पडलेली असून त्याच उपक्रमाचा पुढील महत्त्वाचा टप्पा म्हणून नांदेड येथे २४ व २५ जानेवारी २०२६ रोजी दोन दिवसांचा भव्य शहिदी समागम कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमासाठी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह विविध राज्यांचे मुख्यमंत्री व मान्यवर उपस्थित राहणार आहेत. हा कार्यक्रम ऐतिहासिक करण्यासाठी सर्वांनी सहकार्य करावे व कार्यक्रमाची मोठ्या प्रमाणात प्रचार-प्रसिद्धी करून नांदेड जिल्ह्याच्या नावलौकिकात भर घालावी, असेही नाईक म्हणाले.

# पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी घेतली धर्मराज काडादी यांची भेट

## सोबत राहण्याचा धर्मराज काडादी यांनी दिला शब्द

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : सोलापूर महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी श्री सिद्धेश्वर देवस्थान पंचकमिटीचे अध्यक्ष धर्मराज काडादी यांची शुक्रवारी भेट घेतली. यावेळी पालकमंत्री जयकुमार गोरे आणि पंच कमिटीचे अध्यक्ष धर्मराज काडादी यांच्यात विविध विषयांवर चर्चा झाली. महानगरपालिका निवडणुकीत सोबत राहण्याचा शब्द धर्मराज काडादी यांनी पालकमंत्री जयकुमार गोरे यांना दिला. आमदार सचिन कल्याणशेट्टी, आमदार देवेंद्र कोठे, शरणराज काडादी, पुष्पराज काडादी यांची प्रमुख उपस्थिती होती.




पालकमंत्री जयकुमार गोरे शुक्रवारी सोलापूर दौऱ्यावर होते. यावेळी त्यांनी धर्मराज काडादी यांना भेटण्यासाठी गंगा निवास गाठले. यावेळी धर्मराज काडादी यांनी पालकमंत्री जयकुमार गोरे यांचे स्वागत केले. याप्रसंगी दोघांमध्ये ग्रामदैवत श्री सिद्धरामेश्वर यात्रेबाबत तसेच महानगरपालिका निवडणुकीबाबत चर्चा झाली.

पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी श्री सिद्धेश्वर देवस्थान पंचकमिटीचे अध्यक्ष आणि विशेषतः लिंगायत समाजात मोठे प्रस्थ असलेले धर्मराज काडादी यांची भेट घेतल्यामुळे शहरात मोठ्या संख्येने असलेल्या धर्मराज काडादी यांच्या समर्थकांमध्ये समाधानाची भावना असून धर्मराज काडादी यांना मानणारे हजारो सोलापूरकर याबाबत आनंद व्यक्त करत आहेत. याप्रसंगी प्रभुराज मैंदर्गीकर, अक्षय अंजिखाने उपस्थित होते.

# स्वेरी मधील शिस्त, बनवी करिअर मस्त! : पालक प्रतिनिधी सतीश दिक्षित

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : 'स्वेरी या नावातच एक विश्वास निर्माण झाला आहे. स्वेरी शिक्षण क्षेत्रात कोणत्याही बाबतीत कमी पडत नसल्याचे नेहमीच दिसून येते. त्यामुळे आज स्वेरीचे नाव शिक्षण क्षेत्रात अग्रक्रमाने घेतले जाते. स्वेरीच्या नियोजनामुळे पालकांच्या मनात निश्चिंतता दिसून येते. वसतिगृह असो, वा वर्गातील शिक्षण असो विद्यार्थ्यांच्या करिअरसाठी स्वेरीतील प्राध्यापकांकडून सातत्याने पाठपुरावा सुरू असतो. एकूणच 'स्वेरीतील शिस्त म्हणजे विद्यार्थ्यांचे करिअर मस्त झालेच म्हणून समजा.' असे प्रतिपादन पालक प्रतिनिधी सतीश दिक्षित यांनी केले.



स्वेरीचे संस्थापक डॉ.बी.पी. रोंगे यांच्या दिशादर्शक मार्गदर्शनाखाली व प्राचार्य प्रा.सतीश मांडवे यांच्या नेतृत्वाखाली गोपाळपूर (ता. पंढरपूर) येथील स्वेरी तथा श्री. विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिट्यूट संचलित डिप्लोमा फार्मसीमध्ये प्रथम आणि द्वितीय वर्ष फार्मसीतील विद्यार्थी आणि त्यांच्या पालकांसाठी 'पालक मेळाव्या'चे आयोजन करण्यात आले होते. याला विद्यार्थी व पालकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. यावेळी

**स्वेरीज् डी. फार्मसीमध्ये 'पालक मेळावा' संपन्न**

कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानावरून पालक प्रतिनिधी सतीश दिक्षित हे मार्गदर्शन करत होते. पालक प्रतिनिधी म्हणून अतुल मोरे तर महिला पालक प्रतिनिधी म्हणून शुभांगी जाधव ह्या उपस्थित होत्या. प्रास्तविकात प्रा. सौरभ कौलगी यांनी डी.फार्मसीची माहिती दिली. यामध्ये महाविद्यालयात उपलब्ध सोयी सुविधा, सुसज्ज ग्रंथालय, रात्र अभ्यासिका वर्ग, तसेच शिक्षणासाठी संबंधित महत्वाच्या बाबी सांगितल्या. सोलार रुफटॉप पॉवर प्लांट, प्ले ग्राउंड, जिमखाना, वाचनालयात उपलब्ध असलेली अभ्यासक्रमाची व स्पर्धा परीक्षेसाठी लागणारी संदर्भ पुस्तके, वसतिगृहातील सुविधा, वाहतुकीसाठी बस सुविधा, १०२४ एम.बी.पी.एस. क्षमतेची वाय-फाय इंटरनेट सुविधा, फीडबॅक सिस्टम तसेच औषधांची निर्मिती कशी होते हे पाहण्यासाठी थेट इंडस्ट्रीयल व्हिजीट आदी फार्मसी निगडीत आवश्यक सुविधांची सविस्तर माहिती दिली. पालक प्रतिनिधी अतुल मोरे म्हणाले की, 'विद्यार्थ्यांनी अभ्यासाचे काटेकोर नियोजन करून सातत्य जपले तर यश मिळणारच आणि एखाद्याच्या वाट्याला अपयश आल्यास बिलकुल खचून न जाता अधिक जोमाने अभ्यासावर लक्ष केंद्रित केल्यास सहज यश शक्य होते.' तर शुभांगी जाधव यांनी स्वेरीतून मुलींच्या शिक्षणासाठी, त्यांच्या सुरक्षेसाठी आणि कॉलेज कडून होणाऱ्या संवादाचे कौतुक आणि समाधान व्यक्त केले. यावेळी सोलापूर जिल्ह्यासह लगतच्या जिल्ह्यातील विद्यार्थ्यांचे पालक या मेळाव्यात सहभागी झाले होते. यावेळी गुणवंत विद्यार्थ्यांना पाहुण्यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. यावेळी पालकांनी विविध विषयावर प्रश्न मांडले. यावेळी प्रा. कौलगी यांनी जागेवरच त्या प्रश्नांची उत्तरे दिली तर काही प्रश्न वरिष्ठ पातळीवर सोडविण्याचे आश्वासन दिले. यावेळी जवळपास २०० पालक उपस्थित होते. प्रा. ईशा शेटे व रेश्मा जगताप यांनी सूत्रसंचालन केले तर प्रा.नितल दांडगे यांनी आभार मानले.

# डिकसळ जि. प मतदार संघातून इच्छुक उमेदवार लताताई बौद्धराज रणदिवे यांची सडेतोड मुलाखत



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब प्रतिनिधि/सुधाकर रणदिवे : तालुक्यातील होऊ घातलेल्या पंचायत समिती, जिल्हा परिषद निवडणुकीत इच्छुक उमेदवार सौ. लताताई बौद्धराज रणदिवे यांनी मुलाखतीत सडेतोड उत्तरे दिली.

उमेदवार हा नामधारी नसावा.जनतेचे प्रश्न मांडणारा सुशिक्षित असावा.

उमेदवार हा शेठ, साहेब, भाऊ, ताई, भाई यांचा जवळचा नसून जनतेचे प्रश्न मांडणारा किंवा त्यांच्या अडचणी समजणारा पाहिजे.

उमेदवार हा प्रत्येक दोन महिन्याला चार महिन्याला सहा महिन्याला आपल्या मतदारसंघात काय अडचण आहे कुठल्या गोष्टीची कमतरता आहे ह्या गोष्टीची चौकशी करणार असावा.

प्रशासकीय अधिकारी हा त्या विभागातील त्याला कामाची माहिती असते. पण कार्यकर्ता किंवा उमेदवाराला संबंधित सर्व विभागाबाबत माहिती असणारा पाहिजे. उदा. महावितरण,कृषी, तहसील, वन विभाग, बँक, पोस्ट ऑफिस, पंचायत समिती विभागातील सर्व कार्यालयांची माहिती, त्यांच्या योजना बाबत माहिती, विविध योजनाची माहिती, पोलिस स्टेशन बाबत माहिती, हॉस्पिटल बाबत माहिती असणे गरजेच आहे.

उमेदवार छत्रपती शिवाजी महाराज, डॉ, बाबासाहेब आंबेडकर, यांच्या सारख्या सर्व महापुरुषांच्या विचारांतून चालणारा असावा आठरा पगड जाती , बारा बलुतेदार, शेतकरी, शेत मजुर, सुशिक्षित बेकार, यांना सोबत घेऊन जाणारा असावा. संविधानाच्या, लोकशाहीच्या मार्गाने जाणारा असावा,

# जेऊर येथे आज एकाच व्यासपीठावर दोन पाटील, आमदार नारायण आबा व आमदारा अभिजीत आबा एकत्र दिसणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : जेऊर तालुका करमाळा येथील एका कार्यक्रमात करमाळा मतदार संघाचे विद्यमान आमदार नारायण आबा पाटील व माढा मतदारसंघाचे विद्यमान आमदार अभिजीत पाटील हे एकत्र उपस्थित राहणार असल्याची माहिती पाटील गटाचे प्रवक्ते सुनील तळेकर यांनी दिली. याबाबत अधिक सविस्तर बोलताना तळेकर यांनी सांगितले की, जेऊर तालुका करमाळा येथील भारत शिक्षण प्रसारक मंडळाचे वार्षिक स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरणाचा सोहळा दुपारी दोन वाजता संपन्न होणार आहे भारत शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष तथा आमदार नारायण आबा पाटील यांच्या निमंत्रणात येऊन माढा मतदार संघाचे विद्यमान आमदार अभिजीत पाटील हे आज या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून आपली उपस्थिती दर्शवणार आहेत. या दोन्ही आमदार यांनी विधानसभा निवडणुकीत गृहीत यश मिळवले आहे. आमदार अभिजीत पाटील यांनी आमदार बबनदादा शिंदे यांचे अनेक वर्षाची सत्ता उलटून टाकून विजय संपादन केला तर आमदार नारायण आबा पाटील यांनी माजी आमदार संजय मामा शिंदे यांचा सतरा हजार मताचा फरकाने पराभव करत दुसऱ्यांदा आमदार म्हणून करमाळा मतदार संघाचा पदभार स्वीकारला आहे



एक नवीन राजकीय इतिहास घडलेले हे दोन आमदार विधानसभा निवडणुकीतील गवितेश नंतर करमाळा तालुक्यात प्रथमच एकत्र दिसणार आहेत.विशेष म्हणजे आमदार नारायण आबा पाटील व आमदार अभिजीत पाटील यांना माढा तालुक्यातील मतदारांनी भक्कम पाठिंबा देत निवडून दिले आहे. करमाळा विधानसभा मतदारसंघाचा माढा तालुक्यातील कुर्डवाडी सह छत्तीस गावी जोडलेली आहेत . आमदार अमित पाटील हे माढा मतदारसंघातून निवडून आले आहेत आजचा कार्यक्रम हा शैक्षणिक कार्यक्रम असल्याने या व्यासपीठावर राजकीय विषय येणार नाही. परंतु जिल्हा परिषद पंचायत समितीच्या निवडणुका तोंडावर आल्या असताना या दोन लोकप्रतिनिधींची एकत्र उपस्थिती माढा तालुक्यातील कार्यकर्त्यांना मात्र पोहचान देणारी असणार आहे. दुपारी दोन वाजता भारत हायस्कूल जुनियर कॉलेजच्या प्रांगणात हा भव्य शैक्षणिक १६ पार पडणार असून संस्थेची उपाध्यक्ष अनिल कुमार गांधी या सर्व संचालक हे मान्यवरांचे स्वागत करणार आहेत संस्थेचे सचिव प्राध्यापक अर्जुनराव सरक हे संस्थेचा शैक्षणिक अहवाल सादर करणार असल्याचे तळेकर यांनी सांगितले.

# महायुतीच्या उमेदवार अर्चना संजय भालेराव व अलका गणेश भगत यांच्या प्रचार सभेला उसळला प्रचंड जनसागर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

घाटकोपर/केतन भोज ; प्रभाग क्रमांक १२७ आणि प्रभाग क्रमांक १२६ च्या भारतीय जनता पार्टी,शिवसेना आणि रिपब्लिकन पक्ष महायुतीच्या अधिकृत उमेदवार सौ.अलका गणेश भगत व सौ.अर्चना संजय भालेराव यांच्या प्रचारार्थ राज्याचे कॅबिनेट मंत्री भरतशेठ गोगावले यांची जाहिर सभा आमदार राम कदम यांच्या प्रमुख उपस्थितीत शिल्पा बिल्डिंग मागे गणेश मंदिर शेजारी मैदान याठिकाणी पार पडली.या सभेत मंत्री भरतशेठ गोगावले यांनी प्रमुख अतिथी म्हणून नागरिकांना मार्गदर्शन करताना प्रभाग क्रमांक १२७ आणि प्रभाग क्रमांक १२६ च्या महायुतीच्या अधिकृत उमेदवार सौ.अलका गणेश भगत व सौ.अर्चना संजय भालेराव या दोन्ही उमेदवारांना कमळ या चिन्हांवर मतदान करून त्यांना मोठ्या मताधिक्याने विजयी करून प्रभागातील घराघरात महायुतीचा विचार व विकासकांचा अजेंडा पोहोचवण्याचे आवाहन यावेळी त्यांनी केले.यावेळी महायुतीचे नेते,पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने याठिकाणी या जाहिर सभेला उपस्थित होते.या जाहिर सभेला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद आणि उसळेला जनसागर पाहून याठिकाणी सौ.अलका गणेश भगत व सौ.अर्चना संजय भालेराव या दोन्ही उमेदवारांचा विजय निश्चित आहे,असा ठाम विश्वास वाटतो,असे यावेळी राज्याचे कॅबिनेट मंत्री भरतशेठ गोगावले यांनी सांगितले.

**दोन्ही महायुतीच्या उमेदवारांचा विजय निश्चित; मंत्री भरतशेठ गोगावले**




**पडघा पोलिसांकडून सुविधांचे लाभ घेण्याचे आवाहन**

# पोलिसांच्या सतरा सेवा 'ऑनलाईन'; 'आपले सरकार' पोर्टलवर सुविधा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : शासनाच्या आपले सरकार या पोर्टलवर पोलीस दलाशी संबंधीत असणारे दाखले अथवा अनेक तक्रारी आता ऑनलाईन सेवेद्वारे मिळणार असल्याने आता स्थानिक पोलीस स्टेशनच्या हद्दीत असणाऱ्या अनेक नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे. त्यामुळे आता पोलीस स्टेशनचे उंबरठे झिजवण्याची गरज आता नागरिकांना पडणार नसल्याने ठाणे ग्रामीणचे पोलीस अधीक्षक डॉ. डी. एस. स्वामी. अप्पर पोलीस अधीक्षक अनमोल मित्तल यासह पडघा पोलीस स्टेशनचे पोलिस निरीक्षक जितेंद्र ठाकूर तसेच पडघा पोलिस स्टेशनच्या वतीने नागरिकांना या सरकारी पोर्टलचा लाभ घेण्याचे आव्हान केले आहे. शासनाच्या आपले सरकार पोर्टलने पोलीस दलाशी संबंधित महत्त्वाच्या सेवा ऑनलाईन उपलब्ध करून दिल्या गेल्याने नागरिकांना मोठा दिलासा मिळाला असून अनेक कामांसाठी पोलीस ठाण्यात प्रत्यक्ष जाण्याची गरज उरली नाही. त्यामुळे आता ऑनलाईन उपलब्ध असलेल्या प्रमुख सेवांची यादीच स्थानिक पोलीस स्टेशनने प्रसिद्ध केली आहे.




चारित्र्य प्रमाणपत्र, नोकरी किंवा व्यवसायासाठी लागणारे चारित्र्य प्रमाणपत्र आता ऑनलाईन अर्जाद्वारे मिळते. भाडेकरू माहिती नोंदणी, घरमालक आता त्यांच्या भाडेकरूंची माहिती आपले सरकार केंद्रावरून किंवा स्वतः पोर्टलवरून पोलिसांना कळवू शकतात. बेपत्ता वस्तूंची नोंद मोबाईल, पाकीट किंवा कागदपत्रे हरवल्यास त्याची तक्रार ऑनलाईन नोंदवून तत्काळ पोलीस पावती डाऊनलोड करता येते.

पोर्टलवर नोंदणी करून आवश्यक कागदपत्रे अपलोड केल्यास संबंधित सेवा जलद व सुलभ पद्धतीने मिळतील. त्यामुळे आता पोलीस ठाण्यांतील गर्दी व ताण कमी होण्यास मदत होणार आहे. पोलीस विभागाच्या विविध परवानग्या, प्रमाणपत्रे व ना-हरकत दाखले आता ऑनलाईन उपलब्ध झाल्याने नागरिकांना (उळींळूशप) मोठा दिलासा आहे. विशेषतः परदेश प्रवास, शस्त्र परवाना, कार्यक्रम परवानगी, चित्रपटगृह व मनोरंजनाशी संबंधित सेवा या आता एका क्लिकवर मिळणार आहेत.

# ट्रॅक्टर हेडच्या धडकेने वयोवृद्ध व्यक्ती गंभीर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वैराग : वैराग येथील शिवाजी चौकात नांदणी च्या ८० वर्षीय वृद्धास ट्रॅक्टरच्या हेडने धडक दिल्याने ते गंभीर जखमी झाले . त्यांच्यावर सध्या बार्शी येथील जगदाळे मामा हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू आहे . जखमीचा नातू प्रफुल गायकवाड यांनी वैराग पोलिसात ७ जानेवारी रोजी उशिराने ट्रॅक्टर चालकाविरुद्ध फिर्याद दिल्याने गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

गणपत मल्हारी गायकवाड ( रा . नांदणी ) हे वैराग येथे २८ डिसेंबर रोजी आले होते . दरम्यान दुपारी वैराग मधील गजबजलेल्या छत्रपती शिवाजी महाराज चौकात ट्रॅक्टरच्या हेडने धडक दिल्याने ते हेडखाली पडून गंभीर जखमी झाले. त्यात त्यांचा उजवा हात व उजवा पाय गंभीर जखमी होवून रक्तस्त्राव झाला.

दरम्यान अपघाताची खबर फिर्यादी प्रफुल राजेंद्र गायकवाड ( रा . नांदणी )याला गावातील अतिश यादव याने फोनवरून सांगितले असता फिर्यादी घटनास्थळी दाखल झाला . त्याने पुढे आजोबाला उपचारासाठी प्रथम वैराग येथे प्राथमिक उपचार करून पुढील उपचारासाठी बार्शी येथील जगदाळे मामा हॉस्पिटलमध्ये दाखल केले. त्यांची प्रकृती सध्या गंभीर असल्याचे नातेवाईकांनी सांगीतले.

नातू प्रफुल गायकवाड यांनी दिलेल्या फिर्यादीवरून ट्रॅक्टर ( एम. एच. १३ डी.टी. ५४८२ ) चा चालक महादेव पवार रा. सासुरे ( ता बार्शी ) याचे विरुध्द उशिराने ७ जानेवारी रोजी फिर्याद दिल्याने वैराग पोलीसात गुन्हा दाखल झाला आहे.

सध्या ऊस गाळप हंगाम सुरू आहे . त्यामुळे ट्रॅक्टर चालका कडून हयगयीने ट्रॅक्टर चालवल्याने यापूर्वी वैराग धामणगाव रोडवर व वैराग - माढा रोडवर अपघाताच्या घटना घडल्या आहेत . त्यात अपघातग्रस्त दोघांचाहि उपचारा दरम्यान मृत्यू झाला आहे . त्यामुळे अशा वाहतुकिवर चाप बसणार कधी ? असे नागरिकातून बोलले जात आहे.